जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र 9819208279

प्रेस नोट

दिनांक – १४/०८/२०२६

सायबर क्राईम करणेसाठी बॅक अकाऊंट पुरविणारे तसेच प्रतिबंधित असणाऱ्या, ऑनलाईन बेटींग व गेमिंग चालविणारे आरोपी गुन्हे शाखा घटक –४ उल्हासनगरकडून गजाआड,.

उल्हासनगर परिसरात कार्यरत असलेली सायबर क्राईम करणेसाठी बॅक अकाऊंट पुरविणारे तसेच प्रतिबंधित असणाऱ्या, ऑनलाईन बेटींग व गेमिंग चालविणारे सायबर गुन्हयाद्वारे जनतेची आर्थीक फसवणूक करणारी टोळी कार्यरत असल्याची खात्रीशीर माहिती गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर येथील पोहवा/गणेश गावडे, पोहवा/सतिश सपकाळे यांनी मिळाल्याने, सदर प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा घटक–४, उल्हासनगरकडून छापा कारवाई केली आहे.

सदर प्रकरणाबाबत विठ्ठलवाडी पो.ठाणे गु.र.नं. । १०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (क), ६६(ड) सह महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम कलम ४, ५ प्रमाणे दाखल आहे.

सदर गुन्हयाचे तपासात अद्याप पावेतो एकूण ०६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर गुन्हयाचे तपासात पोलीसांनी मोहोळ, जि.सोलापुर येथे सुरू असलेला संगणीकृत सायबर फसवणुकीचा सेटअप उध्वस्त केला आहे. गुन्हयाचे तपासात आता पावेतो एकुण ३ लॅपटॉप, **२१** मोबाईल फोन, **२३** सीमकार्ड, **१५५** एटीएम कार्ड, **१०५** बॅक पासबुक व चेक बुक, **७४,३५०/–रू.** रोख रक्कम व इतर मुद्देमाल जप्त केला आहे.

गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या बॅक खात्यांवर आता पर्यंत भारतात **एकूण ९६ सायबर पोर्टलच्या** तक्रारी दाखल झाले असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, त्यामध्ये अधिकतम दिल्ली, पंजाब, ओडीसा, महाराष्ट्र राज्य याठिकाणी सायबर फ्रॉडचे गुन्हे नोंद आहेत. सदर गुन्हयामध्ये एकुण **५७ कोटी २५ लाख ४४ हजार २८४/–रू.** एवढया रकमेची सायबर फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यातील काही रक्कम हि अटक आरोपी यांचे ताब्यात सापडलेल्या ए.टी.एम. कार्डचे बॅकचे अंकाऊंट मध्ये आल्याचे तपासात दिसून आले आहे.

अशा प्रकारे सायबर क्राईम करणेसाठी बॅक अकाऊंट पुरविणारे तसेच प्रतिबंधित असणाऱ्या, ऑनलाईन बेटींग व गेमिंग चालविणारे आंतरराष्ट्रीय स्तराव चालू असलेले सायबर फ्रॉड, ऑनलाईनद्वारे आर्थीक फसवणूक करणारे टोळींचा पर्दाफाश करण्यात आला असून, इतर पाहिजे आरोपी आहेत यांचा पोलीस शोध घेत आहेत. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, घटक –४, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेश गज्जल हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस सह आयूक्त सो, (गुन्हे), ,श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त, (शोध–१) यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक/राजेश गज्जल, सपोनि/श्रीरंग गोसावी, पोउनि/अशोक पवार, सपोउनि/बबन बांडे, पोहवा/गणेश गावडे, पो हवा/ राजेंद्र थोरवे, पो.हवा./मंगेश जाधव, पो.हवा/योगेश वाघ, पो.हवा/अशोक थोरवे, पोहवा/प्रकाश पाटील, पोहवा/ रितेश वंजारी, पोहवा/सतिश सपकाळे, पोहवा/अमर कदम, पो.हवा/चंद्रकात सांवत,पोहवा/सुरेश जाधव, पोहवा/शेखर भावेकर, पोहवा/मिलींद हिंदूराव, पोहवा/किशोर पाटील,पोशि/विक्रम जाधव, पोशि/बाबूलाल जाधव, पोशि/प्रसाद तोंडलीकर, पोशि/संजय शेरमाळे, पोशि/रेवणनाथ शेकडे, पो.शि/रामदास उगले, मपोहवा/मिनाक्षी खेडेकर, मपोना/कूसूम शिंदे, मपोशि/मनोरमा सावळे असे पोलीस पथकाने केली आहे.